# परभणी शहर महानगरपालिका, परभणी
## आरोग्य विभाग

जा. क्र. /काबि/आस्था/ 02 / 2024 दिनांक 09 / 02 / 2024

**"राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, 15 वा वित्त आयोग नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना विविध पदांच्या कंत्राटी तत्वावर पदभरती जाहिरात"**

परभणी शहर महानगरपालिका आरोग्य विभाग अंतर्गत राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, 15 वा वित्त आयोग नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना मध्ये विविध पदांच्या कंत्राटी तत्वावर पदभरती करण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. एकूण पदसंख्या, सामाजिक आरक्षण, शैक्षणिक अहर्ता, अनुभव, वय मर्यादा, मानधन व अटी शर्ती तसेच विहित अर्जाचा नमुना परभणी शहर महानगरपालिका संकेत स्थळ www.pcmcparbhani.org वर पाहण्यास मिळेल.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या |
|---|---|---|
| 01 | वैद्यकीय अधिकारी (15 वा वित्त आयोग नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना) | 13 पदे |
| 02 | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी (MBBS) - (NUHM) | 07 पदे |
| 03 | मायक्रोबायोलॉजीस्ट (M. D.) - (NUHM) | 01 पद |
| 04 | स्टाफ नर्स (15 वा वित्त आयोग नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना) | 12 पदे |
| 05 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ - (NUHM) | 01 पद |
| 06 | बहुउद्देशीय कर्मचारी-पुरुष (15 वा वित्त आयोग नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना) | 21 पदे |

अर्ज स्वीकारण्याचे स्थळ : आवक जावक कक्ष, आरोग्य विभाग, परभणी शहर महानगरपालिका, स्टेशन रोड, परभणी.

प्रत्यक्ष कार्यालयात अर्ज व कागदपत्र स्वीकारण्याचा दिनांक : दिनांक 10 / 02 / 2024 ते 16 / 02 / 2024

प्रत्यक्ष कार्यालयात अर्ज व कागदपत्र स्वीकारण्याची वेळ : सकाळी ०९.४५ ते सांयकाळी ०६.१५ पर्यंत

ऑनलाईन जाहिरात व अर्ज पाहणे वेबसाईट : www.pcmcparbhani.org

वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव
पदभरती निवड समिती,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

# परभणी शहर महानगरपालिका, परभणी
## आरोग्य विभाग

जा. क्र. /कावि/आस्था/ 01 /2024 दिनांक 09/02/2024

**राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, 15 वा वित्त आयोग नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना विविध पदांची कंत्राटी तत्वावर पदभरती जाहिरात**

| अ.क्र | पदाचे नाव | पद संख्या | सामाजिक आरक्षण | किमान शैक्षणिक अर्हता | अनुभव | वय मर्यादा | एकत्रित मासिक मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी | 13 | अजा-03, अज-01, विजा(अ)-02, भज(ब)-01, भज(क)-01, इमाव-02, आदुघ-01, खुला-02 | एमबीबीएस पदवीधारक | क्लिनिकल अनुभव शासकीय / खाजगी क्षेत्रातील आणि एमएमसी / एमसीआयएम रजिस्ट्रेशन अनिवार्य | ३८ वर्षे खुला प्रवर्ग, ४३ वर्षे मागास प्रवर्ग (५९ वर्षे शासकीय सेवेतून सेवा निवृत्त असल्यास) | एमबीबीएस पदवीधारक पदाकरीता रु.60,000/- प्रति माह |
| | | | | एमबीबीएस उमेदवार न मिळाल्यास बीएएमएस पदवीधारक | | | BAMS पदवीधारक वैद्यकीय अधिकारी पदाकरिता केंद्र शासनाच्या CPHC मार्गदर्शक सूचनानुसार रु. 25,000/- अधिक रु.15,000/- (PBI) कामावर आधारित मोबदला याप्रमाणे प्रतिमा रु. 40,000/- मानधन प्रती माह |
| ०२ | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | 07 | सामाजिक आरक्षण लागू नाही | एमबीबीएस आणि पदव्युत्तर पदविका किंवा पदवी (स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, फिजिशियन असल्यास प्राधान्य) | क्लिनिकल अनुभव शासकीय / खाजगी क्षेत्रातील आणि एमएमसी रजिस्ट्रेशन अनिवार्य | ४५ वर्षे (५९ वर्षे शासकीय सेवेतून सेवा निवृत्त असल्यास) | रु.30,000/- प्रति माह |
| ०३ | मायक्रोबायोलॉजीस्ट (M. D.) | 01 | अराखीव / कोणत्याही प्रवर्गाचा उम्मेदवार | MBBS With MD Microbiology From Institute Recognized by Medical Council of India | तत्सम पदाचा शासकीय, / खाजगी अनुभव असल्यास प्राधान्य आणि एमएमसी रजिस्ट्रेशन अनिवार्य | ३८ वर्षे खुला प्रवर्ग, ४३ वर्षे मागास प्रवर्ग (५९ वर्षे शासकीय सेवेतून सेवा निवृत्त असल्यास) | रु.75,000/- प्रति माह |
| ०४ | स्टाफ नर्स | 12 | अजा-03, विजा(अ)-02, इमाव-02, आदुघ-01, खुला-04 | १२ वी सह जीएनएम किंवा आरजीएनएम किंवा बीएससी नर्सिंग कोर्स उत्तीर्ण | शासकीय / खाजगी क्षेत्रातील अनुभव आणि एमएनसी रजिस्ट्रेशन अनिवार्य | ३८ वर्षे खुला प्रवर्ग, ४३ वर्षे मागास प्रवर्ग (५९ वर्षे शासकीय सेवेतून सेवा निवृत्त असल्यास) | रु.20,000/- प्रति माह |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 01 | आदुघ-01 | 12 वी विज्ञान सह प्रयोग शाळा तंत्र पदविका (12 sci with D.M.L.T.) | शासकीय / खाजगी क्षेत्रातील अनुभव व महाराष्ट्र परावैद्यक परिषदचे रजिस्ट्रेशन अनिवार्य | ३८ वर्षे खुला प्रवर्ग, ४३ वर्षे मागास प्रवर्ग (५९ वर्षे शासकीय सेवेतून सेवा निवृत्त असल्यास) | रु.17,000/- प्रति माह |
| ०६ | बहुउद्देशीय कर्मचारी – पुरुष | 21 | अजा-03, अज-01, विजा(अ)-02, भज(ब)-01, भज(क)-01, इमाव-03, आदुघ-02, खुला-08 | 12 वी विज्ञान उत्तीर्ण सह पॅरामेडिकल बेसिक ट्रेनिंग कोर्स किंवा सॅनीटरी इन्स्पेक्टर कोर्स (12 th pass in science + paramedical basic training course or sanitary inspector course) | शासकीय / खाजगी क्षेत्रातील अनुभव व रजिस्ट्रेशन अनिवार्य | ३८ वर्षे खुला प्रवर्ग, ४३ वर्षे मागास प्रवर्ग (५९ वर्षे शासकीय सेवेतून सेवा निवृत्त असल्यास) | रु.18,000/- प्रति माह |

टीप :

प्रत्यक्ष कार्यालयात अर्ज स्वीकारण्याचे स्थळ : आवक जावक कक्ष, आरोग्य विभाग, परभणी शहर महानगरपालिका, स्टेशन रोड, परभणी.

प्रत्यक्ष कार्यालयात अर्ज व कागदपत्र स्वीकारण्याचा दिनांक : दिनांक 10/02/२०२४ ते 16/02/२०२४

प्रत्यक्ष कार्यालयात अर्ज व कागदपत्र स्वीकारण्याची वेळ : सकाळी ०९.४५ ते सांयकाळी ०६.१५ पर्यंत

ऑनलाईन जाहिरात व अर्ज पाहणे वेबसाईट : www.pcmcparbhani.org

**<u>अटी व शर्ती</u>** :

1. उपरोक्त नमूद पदांसाठी पदनिहाय नमूद केलेल्या शैक्षणिक व इतर अहर्ता पूर्ण करणाऱ्या इच्छुक उम्मेदवाराकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. उम्मेद्वाराने परिपूर्ण भरलेल्या विहित नमुन्यातील अर्जासोबत शैक्षणिक व इतर प्रमाणपत्रांच्या स्वस्वाक्षांकित छायाप्रति जोडणे आवश्यक राहील. उशिरा प्राप्त झालेल्या अथवा अपूर्ण अर्जाचा विचार केल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.
2. अर्जाची छाननी झाल्यानंतर मुलाखतीसाठी पात्र व अपात्र झालेल्या उम्मेद्वाराची यादी सूचना फलकावर व वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.
3. पात्र उम्मेद्वारांची मुलाखती साठी सकाळी ११.०० वाजता नोंदणी करणे आवश्यक असेल.
4. मुलाखती दिवशी व वेळेवर गैरहजर असणाऱ्या उम्मेद्वाराला अपात्र करण्यात येईल.
5. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणारी अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, मायक्रोबायोलॉजीस्ट ही पदे मुलाखत पद्धतीने भरण्यात येतील व इतर पदे गुणवत्ता यादी ने भरण्यात येतील.
6. अनुक्रमांक ०१ वैद्यकीय अधिकारी या पदासाठी MBBS शैक्षणिक अहर्ताचा उमेदवार न मिळाल्यास MBBS शैक्षणिक अहर्ताचा उमेदवार मिळे पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात BAMS शैक्षणिक अहर्ता असलेल्या उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपात ६ महिने ते ११ महिने चा नियुक्ती आदेश देवून नियुक्ती करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
7. सदरील पदे हि परभणी शहर आरोग्य सोसायटी व इंटीग्रेटेड हेल्थ अंड फमिली वेलफेअर सोसायटी यांच्या अंतर्गत राहतील.
8. एकूण पद व पदांच्या संखे मध्ये बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष, परभणी शहर आरोग्य सोसायटी, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यांनी राखून ठेवलेला आहे.
9. सदरील पदे ठराविक मासिक मानधनावर असून शासनाच्या धोरणानुसार वेतनात बदल होऊ शकतो.
10. सदरील पदे हि निव्वळ कंत्राटी पद्धतीने केवळ प्रकल्प कालावधी पुरते भरवायची असल्याने प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.
11. निवड झालेल्या उमेद्वाराना ११ महिने २९ दिवस किंवा मा. आयुक्त तथा अध्यक्ष ठरवतील तोपर्यंत नियुक्ती आदेश देय राहील.
12. उमेदवारांनी मूळ व छायांकित कागदपत्रासह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे.

13 लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र – लहान कुटुंबाची अट दि. २३/०७/२०२० पासून लागू करण्यात आली असून दि.२३/०७/२०२० पासून ०२ पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरती साठी अर्ज करण्यात पात्र ठरणार नाहीत. विहित नमुन्यातील प्रमाणपत्र पात्र उमेदवाराने रुजू होण्याअगोदर सादर करणे अनिवार्य आहे.

14 शैक्षणिक अर्हता : एस एस सी / एच एस सी सनद, गुणपत्रक, सनद, टीसी, पदवी प्रमाणपत्र, पदवीत्तर पदवी प्रमाणपत्र, इतर कोर्स प्रमाणपत्र, एम.एस.सी. / एम.एन.सी./इतर : नोंदणी प्रमाणपत्र, इत्यादी., अनुभव : अनुभव प्रमाणपत्र., सामाजिक आरक्षण : जात प्रमाणपत्र , ओळख व रहिवासी : आधार कार्ड, मतदान कार्ड, रहिवासी, फोन बिल, लाईट बिल, इत्यादी.

15 ६० वर्षावरील अर्जदारांकरिता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारीरिक योग्यता (Physical Fitness) चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. शासकीय कर्मचारी यांचेबर पूर्वीच्या शासकीय कर्मचारी काळात कुठल्याही स्वरूपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयांची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.

16 छाननीअंती पात्र उमेदवारांना निवड प्रक्रीये करिता प्रवेश दिला जाईल.

17 निवड प्रक्रिये करिता प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार एकास तिन (१:३) किंवा एकास पाच (१:५) याप्रमाणे उमेदवारांना बोलावण्यात येईल.

18 ज्यास्त उमेदवार पात्र असल्यास शैक्षणिक पात्रता पदवी / पदवीत्तर पदवी इत्यादी च्या प्राधान्य क्रमानुसार शेवटच्या वर्षाचे गुण व अनुभव यानुसार गुणाचा कट-ऑफ लावण्यात येईल.

19 निवड प्रक्रियेत थेट मुलाखतीस एकूण ५० गुण असतील. थेट मुलाखती या अतिविशेषतज्ञ, विशेषतज्ञ, वैद्यकीय अधिकारी (MBBS)/(BAMS), मायक्रोबायोलॉजीस्ट हि पदे थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

| अ.क्र. | विवरण | अधिकतम गुण |
|---|---|---|
| ०१ | Subject Knowledge | 10 |
| ०२ | Research & Academic Knowledge | 10 |
| ०३ | Leadership Quality | 10 |
| ०४ | Administrative Abilities | 10 |
| ०५ | Experience | 10 |
| | a) For Govt. Experience-२ marks for one year | |
| | b) For Private Experience-१ marks for one year | |
| | एकूण गुण | 50 |

20 गुणाकन पद्धती- उपरोक्त थेट मुलाखतीमधील पदाव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरिता गुणांकन पद्धतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबवावी.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणाच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० % प्रमाणे proportion ६०x५० / १०० = ३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हते पेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत.<br>मिळालेल्या एकूण गुणाच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proportion काढावे. (उदा.१. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त B.Sc (Nursig) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.Sc (Nursig) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proportion = ६०x२० / १००= १२ गुण) | २० गुण |
| संबधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत.(१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकूण १०० गुण |

a सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवाराची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल. त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येणार आहेत.

b गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

c ज्या पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदांकरीता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापूर्वी त्याची उपसंचालक स्तरावर/जिल्हास्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येणार आहे.

d गुणांकन पद्धतीनुसार भरण्यात येणा-या पदांकरिता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

21. निवड यादी व प्रतीक्षा यादी त्याच दिवशी अथवा निवड समितीच्या निर्देशानुसार प्रसिद्ध करण्यात येईल.

22. निवड प्रक्रियेत अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उम्मेद्वार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेवून प्रतीक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उम्मेद्वाराना तात्पुरती नियुक्ती राखीव प्रवर्गाचा उम्मेद्वार प्राप्त होई पर्यंत देण्यात येईल

23. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.

24. नियुक्ती व निवड प्रक्रीये बाबतचा अंतिम अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष, परभणी शहर आरोग्य सोसायटी, परभणी शहर महानगरपालिका, परभणी यानी राखून ठेवलेला आहे.

25. अर्जासोबत अर्जशुल्क डिमांड ड्राफ्ट "मा. आयुक्त, इंटिग्रेटेड हेल्थ अंड फॅमिली वेलफेअर सोसायटी, परभणी" या नावे राष्ट्रीय कृत बँकेचा खुल्या प्रवर्गासाठी रु. 150/- व राखीव प्रवर्गासाठी रु. 100/- सादर करावा.

26. उम्मेद्वाराने अर्ज शुल्क डिमांड ड्राफ्ट सह परिपूर्ण भरलेला विहित नमुन्यातील अर्ज असल्यासच अर्ज स्वीकारला जाईल व इतर कुठलाही अर्ज स्वीकारल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव
पदभरती निवड समिती,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

अतिरिक्त आयुक्त तथा सदस्य
पदभरती निवड समिती,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

9/2/24
आयुक्त तथा अध्यक्ष
पदभरती निवड समिती,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

अर्ज क्रमांक :

अर्ज क्रमांक :

| | |
|---|---|
| मागासवर्ग अर्जशुल्क रू. | |
| खुलाप्रवर्ग अर्जशुल्क रू. | |
| शुल्क पावती क्रमांक | |

# परभणी शहर महानगरपालिका, परभणी.

## कंत्राटी पदभरती विनंती अर्ज

येथे पासपोर्ट साईज फोटो चिटकवावा

प्रति,
मा.आयुक्त तथा अध्यक्ष,
परभणी शहर आरोग्य सोसायटी,
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी

अर्ज केलेल्या पदाचे नाव : ____________________

अर्जदाराचे पूर्ण नाव : ____________________

अर्जदाराचा पूर्ण पत्ता : ____________________

____________________ पिन कोड ____________________

अर्जदाराचा संपर्क क्रमांक : ____________________

जात प्रवर्ग : ______________ जन्म तारीख : ______________ (DD MM YYYY) वय : ______________ (३१ मार्च २०१७ रोजीचे)

**शैक्षणिक अहर्ता तपशील :**

| शैक्षणिक वर्ष | पदवी/ पदविकेचे नाव | शाळा/ महाविद्यालयाचे नाव | बोर्ड | एकुण प्राप्त गुण/पैकी | एकूण टक्केवारी % | अंतिम वर्षाचे गुण/पैकी | अंतिम वर्षाची टक्केवारी % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० वी | | | | | | | |
| १२ वी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| पदवित्तर पदवी | | | | | | | |
| इतर कोर्स | | | | | | | |
| इतर कोर्स | | | | | | | |
| इतर कोर्स | | | | | | | |

-------------------- (येथून फाडावे.) --------------------

अनुभव तपशिल :

| अ.क्र. | काम केलेल्या संस्थेचे नाव व गावाचे नाव | संस्थेचा प्रकार (शासकीय/ निमशासकीय/खाजगी) | काम केलेल्या पदाचे नाव | एकूण अनुभव (वर्षे- महिना- दिवस) | कामाचे संक्षिप्त स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| १) | | | | | |
| २) | | | | | |
| ३) | | | | | |
| ४) | | | | | |
| ५) | | | | | |

(केवळ वैद्यकीय अधिकारी पदाकरिता )

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक : ________________

(केवळ स्टाफ नर्स व ए.एन.एम.पदाकरिता)

महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक : ________________

उपरोक्त नमूद केलेली सर्व माहिती हि खरी असून यात काही त्रुटी किंवा चूक आढळल्यास माझा अर्ज अपात्र ठरल्यास त्यास मी स्वतः श्री/श्रीमती ________________ जबाबदार असेल तसेच मला सर्व अटी व शर्ती मान्य आहेत. करिता लिहून देत आहे.

**आपला विश्वासू**

(स्वाक्षरी) ........................................

(पुर्ण नाव) ........................................

(उमेदवाराने अर्जासोबत सर्व शैक्षणिक अहर्ता, अनुभव अहर्ताच्या प्रमाणपत्रांच्या स्वयं साक्षांकीत प्रती व शुल्क पावती जोडावी.)

........................................**कार्यालयीन कामकाजाकरिता**........................................

शैक्षणिक अहर्ता कागदपत्र पूर्तता : १० वि ☐ १२ वि ☐ पदवी ☐ पदविका ☐ पदवीत्तर पदवी ☐

अनुभव अहर्ता कागदपत्र पूर्तता : होय ☐ नाही ☐

जात प्रमाणपत्र : होय ☐ नाही ☐

वय पात्रता : होय ☐ नाही ☐

मुलाखतीसाठी पात्रता निकष : पात्र ☐ अपात्र ☐

अपात्र असल्यास कारण : ________________

________________

तपासणी अधिकाऱ्याचे नाव : ________________ पद : ________________

तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी व दिनांक :

------------------------------ (येथून फाडावे.) ------------------------------

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना**

**प्रतिज्ञापन**

**नमुना - अ**

**(नियम ४ पहा)**

मी श्री./श्रीमती/कुमारी ------------------------------------------
श्री. ------------------------------------ यांचा / यांची मुलगा / मुलगी /पत्नी, वय ------------ वर्ष, राहणार ----------------------------------
-------------------------------------------------------------
याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ---------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला --------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक : २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेली मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक : २८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

**(उमेदवाराची स्वाक्षरी)**

ठिकाण :

दिनांक : / /